Reg. No. NP CITY/236/2018-20.

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

प्राधिकृत प्रकाशन

वर्ष ११, अंक ४१ ] गुरुवार ते बुधवार, ऑक्टोबर ९-१५, २०२५/आश्विन १७-२३, शके १९४७ [पृष्ठे ११, किंमत : रुपये ३०.००

स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी प्रत्येक विभागाच्या पुरवणीला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.

## भाग एक–नागपूर विभागीय पुरवणी

अनुक्रमणिका

| | पृष्ठे | | पृष्ठे |
|---|---|---|---|
| **भाग एक-शासकीय अधिसूचना :** नेमणुका, पदोन्नती, अनुपस्थितीची रजा (भाग एक-अ, चार–अ, चार-ब व चार–क, यांमध्ये प्रसिद्ध करण्यात आलेले आहेत त्यांव्यतिरिक्त) केवळ नागपूर विभागाशी संबंधित असलेले नियम व आदेश. | नाही. | **भाग एक-अ.**—(भाग चार-ब यामध्ये प्रसिद्ध करण्यात आलेले आहेत त्यांव्यतिरिक्त) केवळ नागपूर विभागाशी संबंधित असलेले महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या, ग्रामपंचायती, नगरपालिका बरो, जिल्हा नगरपालिका, प्राथमिक शिक्षण व स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम याअन्वये काढण्यात आलेले आदेश व अधिसूचना. | १-४ |
| **संकीर्ण अधिसूचना :** नेमणुका इ. इ., केवळ नागपूर विभागाशी संबंधित असलेले नियम व आदेश. | १-११ | | |

## शासकीय अधिसूचना : नेमणुका, इत्यादी

नाही.

## संकीर्ण अधिसूचना : नेमणुका, इत्यादी

भाग १ (ना. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. ७८६.

### जिल्हाधिकारी, यांजकडून

**भूमि संपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३, अन्वये कलम १९ (१) खालील अधिसूचना**

क्रमांक अका-भूसं.-उविअतुम-कावि-६६९-२०२५.—

ज्याअर्थी, समूचित शासन असलेल्या भंडारा जिल्ह्याच्या जिल्हाधिकाऱ्याने भूमि संपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ (२०१३ चा ३०) (यात यापुढे ज्याचा निर्देश " उक्त अधिनियम " असा केला आहे) यांच्या कलम ११ च्या पोट-कलम (१) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून, अधिसूचना क्रमांक १२४, दिनांक २० फेब्रुवारी, २०२५ अन्वये प्रारंभिक अधिसूचना काढली आहे आणि त्याद्वारे असे अधिसूचित केले आहे की, यासोबत जोडलेल्या अनुसूची-एकमध्ये अधिक तपशीलवार वर्णन केलेल्या जमिनीची, अनुसूची-दोनमध्ये अधिक तपशीलवार विनिर्दिष्ट केलेल्या सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यकता आहे किंवा तिची आवश्यकता भासण्याची शक्यता आहे ;

आणि ज्याअर्थी, भंडारा जिल्ह्याच्या जिल्हाधिकाऱ्याने कलम १५ च्या पोट-कलम (२) अन्वये दिलेला अहवाल कोणताही असल्यास, विचारात घेतल्यानंतर, उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी उक्त जमीन संपादित करण्याची आवश्यकता आहे, याबाबत त्यांची खात्री पटली आहे ;

आणि म्हणून, उक्त अधिनियमाच्या कलम १९ च्या पोट-कलम (१) च्या तरतुदीन्वये उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी उक्त जमिनीची आवश्यकता आहे, असे याद्वारे घोषित करण्यात येत आहे.

आणि ज्याअर्थी, अनुसूची-तीनमध्ये अधिक तपशीलवार वर्णन केलेले क्षेत्र हे बाधित कुटुंबियांच्या पुनर्वसन व पुनर्वसाहतीच्या प्रयोजनासाठी " पुनर्वसाहत क्षेत्र " म्हणून निर्धारित केले असल्याचे याद्वारे घोषित केले जात असून, पुनर्वसन व पुनर्वसाहत योजनेचा सारांश अनुसूची-चारमध्ये विनिर्दिष्ट केला आहे;

आणि म्हणून, त्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम ३ च्या खंड (छ) अन्वये, समूचित शासन असलेला जिल्हाधिकारी, उक्त अधिनियमान्वये जिल्हाधिकाऱ्यांची कार्ये पार पाडण्यासाठी उपविभागीय अधिकारी, तुमसर यांना पदनिर्देशित करीत आहे.

## अनुसूची-एक

### संपादित करावयाच्या जमिनीचे वर्णन

भूसंपादन प्रकरण क्रमांक १३-एलक्युएन-२०२४-२५, मौजा कोष्टी , ता. तुमसर, जिल्हा भंडारा.

| अनुक्रमांक | भूमापन किंवा गट क्रमांक | संपादनाखालील क्षेत्र |
|---|---|---|
| (१) | (२) | (३) |
| | | हे. आर |
| १ | १४७/३ | ० ०३ |
| २ | ६३ | ० ०४ |
| ३ | ३४ | ० ०८ |
| | एकूण . . | ० १५ |

## अनुसूची-दोन

### सार्वजनिक प्रयोजनाच्या स्वरूपाबाबत विवरण

प्रकल्पाचे नाव :— बावनथडी प्रकल्प.

प्रकल्प कार्याचे वर्णन :— बाम्हणी वितरीका बाम्हणी लघु कालव्याच्या बांधकामाकरीता.

समाजाला मिळणारे लाभ :— या प्रकल्पामुळे शेतीसाठी पाणी, सार्वजनिक पाणी पुरवठा, क्षेत्र सिंचनाखाली येणार असल्यामुळे शेतकऱ्यांना सिंचनाचा लाभ होणार आहे व त्याच बरोबर ग्रामिण भागातील कष्टकरी, शेतकरी, शेतमजूर यांना रोजगाराच्या संधी उपलब्ध होणार असून त्यांच्या जिवनमानात सुधारणा होणार आहे.

## अनुसूची-तीन

### पुनर्वसाहत क्षेत्राचे वर्णन

पुनर्वसाहत करण्याची आवश्यकता नाही, सबब माहिती — निरंक —

## अनुसूची-चार

### पुनर्वसन व पुनर्वसाहत योजनेचा सारांश

महाराष्ट्र शासन, अधिसूचना २६ एप्रिल, २०१८ अन्वये भूमि संपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ चे कलम १० (क) अन्वये सिंचन प्रकल्पाला उक्त अधिनियमाचे प्रकरण २ व ३ यांच्या तरतुदी लागू करण्यापासून सूट देण्यात आली आहे.

**टीप :–** उक्त जमिनीच्या आराखड्याचे उपविभागीय अधिकारी, तुमसर यांचे कार्यालयामध्ये निरीक्षण करता येईल.